जा.क्र.पिआरओ/उत्कृष्ट कामगीरी/२०१८
कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक :-

**विषय :- Positive Stories/Good Work बाबत माहिती**

संदर्भ :- सायबर पोस्टे/केंद्रीय वेबसाईट/२०१८-१३४७, दिनांक २०/११/२०१८

०००

उपरोक्त विषयास अनुसरुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी /कर्मचारी यांनी माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये खालील प्रमाणे उल्लेखनिय कामगिरी केलेली असल्याने ती Positive Stories/Good Work म्हणुन संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

श्री डॉ. हरी बालाजी, अपर पोलीस अधीक्षक (अभियान), गडचिरोली यांचे नेतृत्वाखाली विशेष अभियान पथक व सिआरपीएफ १९२ बटालियन यंग प्लाटुनचे जवान पोलीस मदत केंद्र गॅरापत्ती अंतर्गत मौजा निहायकल जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दिनांक १९/११/२०१८ रोजी सकाळी ०८.३० ते ०९.०० वा. चे सुमारास दबा धरुन बसलेल्या माओवादयांनी पोलीस पथकावर त्यांना जिवे मारण्याच्या उद्‌देशाने अंदाधुंद गोळीबार केला तेव्हा पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ माओवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. माओवादयांच्या गोळीबारास न जूमानता पोलीस पथक आगेकुच करत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला. यानंतर सदर ठिकाणी शोध मोहिम राबविली असता हिरवे काळे रंगाच्या गणवेश घातलेल्या दोन महिला माओवादी निपचीत अवस्थेत आढळुन आले. त्यापैकी ०१ महिला माओवादीची ओळख पटली असुन तिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे अंतर्गत १६ गुन्हे दाखल असुन तिचेवर महाराष्ट्र शासनाने चार लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.

३०।११।१८

**( महेंद्र पंडित)**
अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली

प्रति,
पोलीस निरीक्षक
सायबर पोस्टे, गडचिरोली